नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 08/03/2021 (सोमवार)
(दुपार)

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 8 कि.मी. पारडसिंगा रोड ढिवरवाडी शिवार येथे दिनांक 10/01/2021 चे 19:30 वा. ते 20.00 वा. दरम्यान आरोपी नामे– नरेश छोटू चावरीया(मृतक), वय 30 वर्ष, रा. हत्तीखाना काटोल हा त्याचे एमएच–40/ एए–7266 क्रमांकाच्या मोटरसायकलवर मित्र नामे– संचीत पुरूषोत्तम खडसे, रा काटोल यास पाठीमागे बसवून तो पारडसिंगा ते काटोल जात होता. त्यादरम्यान आरोपीने त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने त्याचा ताब्यातील नियंत्रण सुटल्याने ते दोघेही रोडवर स्लिप होवून पडले. या अपघातात मोटरसायकल चालक नरेश चावरीया याला डोक्याला व छातीला गंभीर मार लागला तसेच पाठीमागे बसणाऱ्या मित्राला किरकोळ मार लागला. मोटरसायकल चालक याचा उपचार प्रथम ग्रामीण रूग्णालय काटोल व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता उपचारा दरम्यान दि. 11/01/2021 रात्री 01.00 वा. त्यांचा मृत्यु झाला. पोस्टे. काटोल येथे मर्गचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे सफौ जवाहर चव्हाण पो. स्टे. काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 146, 196, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ जवाहर चव्हाण 9545363121 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 06/03/2021 चे 16:30 वा. चे सुमारास फिर्यादी यांची 7 वर्षीय मुलगी/पिडीता हिला आरोपी नामे– डफरे उर्फ मुकेश प्रेमदास सहारे, वय 26 वर्ष, रा. सोनेगाव ता. कळमेश्वर याने तिला संत्रे देण्याचे आमीष दाखवुन तिला फुस लावून आपले घरी नेले. यानंतर आरोपीने पीडितेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ), 363 भादंवि. सहकलम 8 बाल लैंगीक अत्याचार प्रतिअंधक कायद्यन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सावळा 94055887127 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर